जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २७ | शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

# सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर विद्रुपीकरणाचा गुन्हा

## पाच हजार रुपये दंड वसूल करणार; कदमवाकवस्ती ग्रामपंचायत ॲक्शन मोडवर !

**लोणी काळभोर, ता. ३० :** दुकानासमोर कचरा टाकण्यासाठी डस्टबिन नसेल, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला असेल अथवा कचरा जाळला, तर प्रशासनाकडून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाते आणि दंड आकारला जातो. असे आपण अनेकदा बातम्यांमध्ये ऐकले आहे. मात्र आता सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणार असाल तर आताच सावध व्हा. नाहीतर तुम्हालाही ५ हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. कारण कदम वाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत प्रशासन सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर गाव विद्रुपीकरणाचा गुन्हा दाखल करून ५ हजार रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती उपसरपंच नसीर पठाण यांनी दिली आहे.

तुम्हाला हे खोटे वाटत असेल पण हे १०० नव्हे १००० टक्के खरे आहे. कदमवाकवस्तीची मासिकसभा मंगळवारी (ता.२९) पार पडली. यावेळी कदमवाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड, गौरी गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य आकाश काळभोर, अविनाश बडदे, सलीमा पठाण, सुनंदा काळभोर, सिमिता लोंढे, मंदाकिनी नामुगडे, ग्रामविकास अधिकारी अमोल घोळवे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासभेत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर वरील प्रमाणे निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. त्यानंतर कदमवाकवस्ती ग्रामपंचायत क्शन मोडवर आली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने त्वरित या निर्णयाची अंमलबजावणी करून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याच्या ठिकाणी या कारवाईचे फ्लेक्स लावले आहेत.




मागील चार महिन्यांपासून कदम वाकवस्ती ग्रामपंचायत व स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ओला-सुका कचरा संकलन व घनकचरा व्यवस्थापन करीत आहे. घरोघरी जावून कचरा संकलन, वर्गीकरण व व्यवस्थापन करण्यात येत आहे. प्रत्येक घरासाठी ६० रुपये व हॉटेल व्यावसायिकांना १५० रुपये मासिक शुल्क आकारले जात आहे. कचरा संकलनामुळे थोड्याच दिवसात कदमवाकवस्ती गाव कचरा मुक्त होऊन स्वच्छ होणार होते. मात्र काही नागरिकांनी या योजनेला हरताळ दाखवली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने वरील निर्णय घेतला आहे. तसेच कचरा टाकणाऱ्याचा फ्लेक्स बनवून प्रसिद्ध करण्यात येईल. असे नसीर पठाण यांनी सांगितले आहे.

दरम्यान, कदमवाकवस्ती गावात स्वच्छ टीम च्या माध्यमातून डोअर टू डोअर कचरा गोळा केला जात आहे. महानगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या रहवाशांप्रमाणे कदमवाकवस्तीतील नागरिकांना सेवा देण्याचा प्रयत्न ग्राम पंचायत प्रशासनाने केला आहे. परंतु, काही नागरिक घरातील कचरा हा कचरा वेचकांना न देता तो सार्वजनिक ठिकाणी टाकत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने गावाचे विद्रुपीकरण टाळण्यासाठी तसेच गाव स्वच्छ व सुंदर दिसण्याच्या दृष्टीकोनातून उचललेले पाऊल हे एक महत्वाचे ठरणार आहे.

### जिल्हा परिषद शाळेत टवाळखोरांकडून रोजच कचरा

कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीच्या भितीला खेटूनच वाकवस्तीची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळेच्या अंगणात दररोज रात्रीच्या सुमारास काही टवाळखोर मुले येतात. आणि धिंगाणा करून शाळेचे नुकसान करतात. शाळेच्या परिसरात सिगारेट, गुटखा, तंबाखू या बरोबर दारूच्या बाटल्यांचा कचरा टाकत आहेत. ज्ञानदानासारखे पवित्र कार्य केले जाते. त्याच मंदिरात टवाळखोर दररोज कचरा करीत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासन या टवाळखोर मुलांवर कधी व काय कारवाई करणार? हेही पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

> कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीने स्वच्छतेच्या संदर्भात घेतलेला हा निर्णय योग्य आहे. आपले गाव स्वच्छ ठेवणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. तुम्हाला कामामुळे कचरा वेचकांकडे कचरा देणे शक्य नसेल तर कचरा बाहेर डस्टबिनमध्ये ठेवा. कचरा वेचक तुमचा कचरा उचलून घेऊन जातील. नागरिकांनी कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो कचरा वेचकांनाच द्यावा. इतरत्र कचरा टाकणारा जवळचा लांबचा अथवा कुणीही असो, टाकलेला कचरा त्यालाच उचलण्यास सांगून त्याच्याच घरासमोर टाकण्यात येईल. अशी ग्रामपंचायतीची भूमिका आहे. नागरिकांनी ग्राम पंचायतीला सहकार्य करावे. अन्यथा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यावर गाव विद्रुपीकरणाचा गुन्हा दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच कचरा टाकणाऱ्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.
> - **चित्तरंजन गायकवाड,** ( माजी सरपंच, कदमवाकवस्ती, ता. हवेली)



## मानाचे पाच गणपती निघाल्यावर आम्ही लगेचच निघणार

### भाऊ रंगारी आणि मंडई गणपती मंडळाचा निर्णय

**पुणे, ता. ३१ :** आगामी गणेशोत्सवाच्यापार्श्वभूमीवरपुण्यातील वैभवशाली विसर्जन मिरवणुकीसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यंदा गणेशोत्सवाला २७ ऑगस्ट रोजी सुरुवात होत असून, अनंत चतुर्दशी ६ सप्टेंबर रोजी आहे. त्याआधीच विसर्जन मिरवणुकीसंबंधी नियोजनासाठी गणेश मंडळांनी हालचाली सुरू केल्या आहेत.

यंदा अनंत चतुर्दशीच्या दिवशी, पुण्यातील मानाचे पाच गणपती मार्गस्थ झाल्यानंतर, त्यांच्या पाठोपाठ अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेश मंडळ विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मानाचा पाचवा गणपती कसबा गणपती मिरवणुकीला निघाल्यानंतर लगेचच ही दोन मंडळे आपल्या मूर्तींच्या मिरवणुका सुरू करतील, अशी घोषणा संबंधित मंडळांच्या अध्यक्षांनी आज पत्रकार परिषदेत केली.

अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी सांगितले की, ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३७ वाजता चंद्रग्रहण लागणार आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार ग्रहण काळात देवतांच्या मूर्ती झाकून ठेवाव्या लागतात, त्यामुळे दुपारी १२ वाजण्यापूर्वी सर्व गणेशमूर्तींचे विसर्जन पूर्ण होणे अत्यावश्यक आहे.

थोरात पुढे म्हणाले की, सर्व गणेश मंडळांनी आपली मिरवणूक रविवारी दुपारी १२ वाजण्यापूर्वी पूर्ण करावी. त्यासाठी ढोल पथकांची संख्या शक्य तितकी मर्यादित ठेवावी, जेणेकरून वेळेचा अपव्यय होणार नाही.

दरम्यान, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाबाबत कुठलाही वाद नसून, कदाचित त्यांच्या आधी आमची मिरवणूक निघेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मानाच्या गणपती मंडळांनाही त्यांच्या ढोल पथकांच्या संख्येबाबत चर्चा करण्याचे संकेत अण्णा थोरात यांनी दिले.

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सातही आरोपी निर्दोष; 'एनआयए' च्या विशेष न्यायालयाचा निकाल

**मुंबई, ता. ३१ :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात बुधवारी (ता. ३१) तब्बल १७ वर्षांनी मोठा निकाल दिला आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा 'एनआयए च्या विशेष न्यायालयाने गुरुवारी ( ३१ जुलै) दिलेल्या ऐतिहासिक निर्णयात भाजप खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यासह सर्व सातही आरोपींना निर्दोष मुक्त केले आहेत.

विशेष न्यायालयाने निकालात स्पष्ट केले की, मालेगावमध्ये स्फोट झाल्याचे पुरावे सरकारी वकिलांनी सादर केले, परंतु त्या स्फोटासाठी वापरलेली मोटारसायकल आणि बॉम्ब याम धील संबंध ठोसपणे सिद्ध करता आले नाहीत. न्यायालयाने नमूद केले की, काही जखमींच्या वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये छेडछाड करण्यात आली होती. तपासात झालेल्या अनेक त्रुटीही न्यायालयाच्या निदर्शनास आल्या.

न्यायालयाने स्पष्ट केले की, लेफ्टनंट कर्नल श्रीकांत प्रसाद पुरोहित यांच्या निवासस्थानी स्फोटके साठवण्यात आल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही. पंचनामा करताना, तपास अधिकाऱ्यांनी गुन्ह्याच्या ठिकाणाचे कोणतेही



रेखाचित्र तयार केले नाही. तसेच गुन्ह्याच्या ठिकाणावरून कोणतेही बोटांचे ठसे, डंप डेटा किंवा इतर कोणतीही माहिती गोळा केली गेली नाही, त्यामुळे न्यायालयाने हा तपास अपुरा व त्रुटीपूर्ण असल्याचे मत नोंदवले.

या प्रकरणात कठोर दहशतवादविरोधी कायदा (UAPA) लागू करण्यासंदर्भात देखील न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने म्हटले की, संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक ती परवानगी घेण्यात आली नव्हती, त्यामुळे UAPA अंतर्गत प्राप्त आदेश कायदेशीरदृष्ट्या सदोष ठरले आणि त्यामुळे तो कायदा या प्रकरणात लागू होऊ शकत नाही.

२९ सप्टेंबर २००८ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मालेगावच्या भिखू चौकात बॉम्बस्फोट झाला होता. रमजान आणि नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक मोठ्या संख्येने बाहेर होते. या भीषण स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर शंभरहून अधिक जखमी झाले होते. मालेगाव हे प्रामुख्याने मुस्लिम बहुल शहर असून या घटनेमुळे राज्यभरात तणाव निर्माण झाला होता.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाचे (ATS) तत्कालीन प्रमुख व शहीद आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला होता. त्यांनी एकूण १२ आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. यातील पाच आरोपींना आधीच निर्दोष ठरवण्यात आले होते. उर्वरित सात आरोपींवर निकाल१९ एप्रिल २०२५ रोजी राखून ठेवण्यात आला होता, जो आज जाहीर करण्यात आला.

## राजगड पोलिस ठाण्याच्या मनमानी कारभाराविरोधात बोंबाबोंब आंदोलन

### पत्रकारावर कारवाई आणि पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदलीची मागणी

**महेंद्र शिंदे**

खेड शिवापूर, ता. ३१ : राजगड पोलिस ठाण्याच्या मनमानी कारभाराविरोधात रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कामगार आघाडीतर्फे आज (गुरुवारी) पाषाण येथील पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात जोरदार बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलिसांच्या मदतीने चौकीत येणाऱ्या नागरीकांशी हस्तक्षेप करणाऱ्या पत्रकारावर कारवाई आणि पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या बदलीची मागणी करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व कामगार आघाडीचे नेते प्रदीप कांबळे यांनी केले. त्यांनी पोलिस अधीक्षक संदीप सिंह गील यांच्यासमोर राजगड पोलिस ठाण्यातील नागरिकांना येणाऱ्या अडचणी मांडल्या. तसेच




पोलिसांचा मनमानी कारभार सुरू असून सबंधित पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात कारवाई करावी, अशी मागणी केली.

राजगड पोलिस ठाण्यात वरीष्ठांचा आदेश असतानाही आम च्या तक्रारी दाखल करून घेण्यात येत नाही, पैशाची मागणी करण्यात येते. सबंधित पत्रकार, पोलिस कर्मचारी आणि झिरो पोलिस रात्री बेरात्री नागरीकांच्या घरी जाऊन अवैध धंदे सुरू असतील तर सेटलमेंट करून देण्याची भाषा करतात, अशा तक्रारी यावेळी उपस्थित नागरीकांनी गिल यांच्यासमोर मांडल्या.

आमच्या मागण्या आणि आम्ही सादर केलेले पुरावे तपासून राजगडचे पोलिस निरीक्षक राजेश गवळी, सबंधित पत्रकारांच्या मदतीने सामान्य नागरीकांना धम कवणारे पोलिस कर्मचारी यांची बदली करण्यात यावी, सबंधित पत्रकारावर कारवाई करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. आम्हाला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन करण्यात येईल.

> या आंदोलनाची दखल घेऊन संबंधितांची खातेनिहाय चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचा अहवाल मंगळवारपर्यंत येईल. त्यात जे जे दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.
> - **संदीप सिंह गिल,** जिल्हा (ग्रामीण) पोलिस अधीक्षक

## इंस्टाग्रामवरून झालेली ओळख तरुणीला महागात

### सोन्याची चैन घेऊन तरुण पसार, शिरूर येथील घटना

**शिरूर, ता. ३१ :** शिरूर शहरातील ओमरूद्रा कॉलनीत सोशल मीडियावरून ओळख झालेल्या तरुणावर विश्वास ठेवणं एका युवतीला चांगलंच महागात पडलं. इंस्टाग्रामवरून मैत्री झालेल्या तरुणाने लोणावळा फिरायला नेल्यानंतर परतताना तिच्या गळ्यातील तब्बल १.४० लाखांची सोन्याची चैन घेऊन पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूरच्या ओमरूद्रा कॉलनीतील रहिवासी शुभांगी विजय काळे (वय २२) हिने दिलेल्या तक्रारीनुसार, तिची ओळख इंस्टाग्रामवरून पवन आंबादास सुरवसे (रा. डिसलेवाडी, जामखेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) याच्याशी झाली होती. काही महिन्यांच्या ऑनलाइन संवादानंतर पवनने शुभांगी आणि तिच्या मित्र-मैत्रिणींना लोणावळा फिरायला जाण्याचे आमंत्रण दिले.

२४ जुलै रोजी दोन दिवसांच्या सहलीनंतर २६ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता सर्वजण परत शिरूरला आले. घरासमोर पोहोचल्यावर, पवनने शुभांगीच्या गळ्यातील अंदाजे दीड तोळ्यांची सोन्याची चैन, ज्यावर गणपतीचे लॉकेट होते, ती पाहण्यासाठी मागितली. शुभांगीने विश्वासाने ती चैन त्याच्या हाती दिली. पवनने ती आपल्या गळ्यात घालून, मीही अशीच चैन बनवणार आहे, असे सांगितले. मात्र, ती गाडीतून खाली उतरल्यावर त्याने कोणतीही पूर्वसूचना न देता गाडीने धूम ठोकली आणि त्यानंतर संपर्कही केला नाही. दरम्यान, शुभांगीने त्याच्याशी संपर्क साधण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला, मात्र त्याने तिचे कॉल उचलले नाहीत, ना चैन परत केली. अखेर तिने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बापाची मान खाली जाईल, असे वर्तन करू नका : डॉ. वसंत हंकारे

### डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कांचन यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**उरुळी कांचन, ता. ३१ :** तुमच्यासाठी राजकुमार आणून देण्याची हिंमत तुमच्या बापात निश्चित आहे मात्र सोशल मीडियावरील मैत्रीला भुलून वाईट मार्गाला जाऊन आई बापाची मान खाली जाईल, असे वर्तन करू नका. चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हा. असे आव्हान व्याख्याते डॉ. वसंत हंकारे यांनी केले.

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ज्ञानोबा कांचन यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (ता. ३०) इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ श्रीकृष्ण मंगल कार्यालय उरुळी कांचन येथे उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण डॉ. वसंत हंकारे यांचे बाप समजावून घेताना हे प्रभावी व्याख्यान शालेय किंवा महाविद्यालयीन जीवनात व्याख्याते डॉ. वसंत हंकारे यांनी केले. दरम्यान त्यांचे व्याख्यान ऐकून उपस्थित सर्वच भावुक झाले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना हंकारे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. रंगनाथ नाईकडे होते. सर्व उपस्थितांच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र कांचन यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी उरुळी कांचन देवस्थानचे अध्यक्ष ज्ञानोबा तुळशीराम कांचन, उरुळी कांचनच्या सरपंच ऋतुजा अजिंक्य कांचन, माजी आदर्श जिल्हा परिषद सदस्य महादेव कांचन, किर्ती कांचन, यशवंत कारखान्याचे संचालक संतोष कांचन, माजी सरपंच संतोष हरिभाऊ कांचन, अमित कांचन, राजेंद्र कांचन, घोडगंगा कारखान्याचे उपाध्यक्ष पोपटराव भुजबळ, श्रीनाथ म्हस्कोबा पतसंस्थेच्या उपाध्यक्ष संगिता टिळेकर, सराफ असोसिएशनचे जयप्रकाश बेदरे, माजी उपसरपंच युवराज कांचन, संचिता कांचन, सिमा कांचन, सविता कांचन, जयंत काळभोर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम दास पंढरीनाथ चौधरी यांनी केले. यावेळी त्यांनी संस्थेच्या आर्थिक वाटचालीविषयी माहिती दिली. संस्थेच्या ३२२ कोटी ठेवी असून, २३५ कोटी रुपये कर्जवाटप केले आहे. संस्थेतर्फे गरजू गरीब विद्यार्थांना शालोपयोगी साहित्य वाटप व चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रसंगी संचालक शरद वनारसे, भाऊसाहेब कांचन, कांतीलाल चौधरी, संजय कांचन, खेम चंद पुरुषवानी, संजय टिळेकर, धनसिंग पोंदकुले, अनिकेत कांचन, सौ सारिका काळभोर, कमल कांचन, रोहिदास उंद्रे, प्रवीण दरेकर, लक्ष्मण वाल्हेकर (मुख्य व्यवस्थापक) यांचाही कार्यक्रमात सक्रिय सहभाग होता.

दरम्यान, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक ह.भ.प.जीवन शिंदे यांनी केले. संस्थेला सहकार क्षेत्रात उत्कृष्ट व गुणवत्ता पूर्ण कार्य केल्याबद्दल संस्थेला पुरस्कार मिळाल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

> दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांनी जबाबदारीने निर्णय घ्यावेत आणि जीवनात योग्य दिशा निवडताना आई वडिलांच्या मार्गदर्शनाचा आधार घ्यावा. तसेच संस्थेचा उद्देश केवळ ठेवी गोळा करणे व कर्ज वाटप करणे एवढाच नसून, सामाजिक बांधिलकी म्हणून संस्थेतर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये रक्तदान, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, वृक्षारोपण, मंदिरांना मदत, आपत्तीग्रस्त यांना मदत यांचा देखील समावेश आहे.
> - **राजेंद्र कांचन,** अध्यक्ष, डॉ. मणिभाई देसाई पतसंस्था, उरुळी कांचन, ता. हवेली

# लोणी काळभोर येथे रिमझिम पावसात वनभोजन संपन्न

**लोणी काळभोर, ता. ३१ :** परिसरात भरपूर पाऊस पडावा म्हणून वरूणराजाची प्रार्थना करण्यासाठी लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामस्थांच्या वतीने तीर्थक्षेत्र रामदरा शिवालयात परंपरेनुसार वनभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या वनभोजनाच्या कार्यक्रमात हजारो नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.



लोणी काळभोर व कदम वाकवस्तीचे ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथची पालखी दरवर्षीप्रमाणे जुन्या अंबरनाथ मंदिरापासून तीर्थक्षेत्र रामदरा येथे नेण्यात आली. सकाळी दहा वाजता पालखी सोहळा अंबरनाथच्या मंदिराला प्रदक्षिणा घालून पुढे निघाला. या सोहळ्यात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गुलालाची उधळण करत, विविध संतांचे अभंग गात सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या तीर्थक्षेत्र रामदरा येथे हा पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात पोहचला.

रामदरा येथे पालखी सोहळा पोहचल्यानंतर महंत हेमंतपुरी महाराज यांच्या हस्ते विधीवत पुजा करण्यात आली. हभप विनोद महाराज काळभोर व दत्तात्रय महाराज काळभोर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. रामदरा येथील राममंदिरात आरती झाल्यानंतर दर्शन घेऊन डोंगरावरील गोवर्धन पर्वताची पुजा करण्यात आली. त्यानंतर श्रीमंत अंबरनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने उपस्थितांना पुरणपोळी, बुंदी, सांबर, भात, शिरा महाप्रसाद देण्यात आला. याबरोबरच भाविकांनी आपापल्या घरुन पुरण पोळी आणली होती. यावेळी एकमेकांना आग्रह करून पुरणपोळी खायला देण्यात आली.

दरम्यान, भोजन झाल्यावर पालखी सोहळ्याच्या परतीच्या प्रवासात अंबरनाथाची दोन्ही मंदिरे, महादेव, विठ्ठल व मारुतीच्या मंदिरात आरती झाली. त्यानंतर पालखी परत ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथाच्या जुन्या मंदिरात आली. तेथे आरती होऊन वनभोजनाची समाप्ती झाली.

# आलेगाव पागा येथून १४ बेठविगार मजुरांची सुटका; शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**शिरूर, ता. ३१ :** ऊससतोड कामासाठी बोलावलेल्या तीन कुटुंबांना जवळपास दोन वर्षे डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार शिरूर तालुक्यात उघडकीस आला आहे. या घटनेची माहिती शिरूर पोलिसांना मिळताच लहान मोठ्या मुलांसह १४ जणांची शिरूर पोलिसांनी सुटका केली आहे. याप्रकरणी आलेगाव पागा (ता. शिरुर) येथील एकावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ०१ जानेवारी २०२३ रोजी ते ३० जुलै २०२५ रोजी पर्यंत गणेशनगर, आलेगाव पागा ता. शिरुर हद्दीत घडली आहे.

संदिप बाळु डुबे (रा.गणेश नगर आलेगाव पागा, ता. शिरुर जि.पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी ज्ञानेश्वर साहेबराव चव्हाण (वय-३१, व्यवसाय- उसतोड, मुळ रा. ब्रम्हगाव ता. पैठण जि. संभाजीनगर, सध्या रा. गणेशनगर आलेगाव पागा ता. शिरुर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे वडील साहेबराव चव्हाण, आई, भाऊ, भावजयी व त्यांच्या तीन मुली व एक मुलगा, बहीण त्याच्या दोन मुली, दाजी, यांच्यासह गणेश नगर आलेगाव पागा ता.शिरुर येथे राहण्यास असुन ऊसतोडीचे कामे करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. तसेच संदिप डुबे याच्याकडे सन २०२३ साला पासुन गुराळाच्या उसतोडी करीत होते.

गुराळाकरीता उसतोडी करण्यासाठी वरील कुटुंबे आली असता संदिप डुबे यांनी तिन्ही कुटुंबियांना प्रत्येकी २० हजार अशी ६० हजार रुपये उचल दिली होती. दोन अडीच वर्ष झाली काम करीत असताना कामाचा मोबदला म्हणुन प्रतिटन प्रमाणे २५० रु देत असे परंतु सदर कामाचा हिशोब संदिप डुबे याला वारंवार मागणी केली मात्र तो देत नव्हता.

आई आजारी पडल्यावर तिच्या उपचाराकरीता सरकारी दवाखाना न्हावरा येथे गेलो असता संदिप डुबे यांनी त्याचा लहान भाऊ दत्ता डुबे याला उपचार घेवु न देता आम्ही पळुन जात होतो असे समजुन आम्हाला परत आम्ही राहत असलेल्या ठिकाणी घेवुन आला. आमचे नातेवाईक मयत झाल्यावर आम्ही गावी जाण्याकरीता मालक संदिप डुबे याला विचारले असता त्यांनी आम्हाला ऊसतोडायचे काम शिल्लक असुन तुम्ही गावी जायचे नाही असे म्हणुन धमकी देत असे.

मागील सहा महिन्यांपूर्वी दाजी श्रीधर लोंढे यांना संदिप डुबे यांनी ऊसतोड करीता का गेले नाही या कारणावरुन ऊसाने मारहाण केली होती. पोलिसांत तक्रार केली तर तुम्हाला सोडणार नाही अशी धमकीही दिली होती. दुसऱ्या गावात जाण्यास व येण्यास बंदी घातली होती. तसेच दर १५ दिवसांनी आठवडा बाजार व गरजेच्या वस्तु आणण्याकरीता १५०० रुपये देत गावी जाण्यास बंदी घालत होता. दरम्यान, मंगळवारी (ता. ३०) एक वाजण्याच्या सुमारास शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, पोलीस हवालदार शिंदे, ससे, नायब तहसीलदार स्नेहा गिरीगोसावी, कामगार अधिकारी संपत गुंजाळ, लेबर लाईन एन.जी.ओ.शुभम वसंत गुरव, पराग कांबळे, अर्चना यादव, वकील कॅरोल परेरा, हेलीना थोरात, डी.एस. महापुरे व आलेगाव पागा गावचे पोलीस पाटील तेथे येवुन लहान मोठ्या १४ जणांची तसेच गाई, बकरी, कोंबडया, अशा सर्वांची सुटका केली. त्यानंतर शिरुर पोलीस ठाण्यात सर्वांना आणण्यात आले.

# खंडणी मागणाऱ्या अज्ञात आरोपीला मुंढवा पोलिसांकडून अटक

**मुंढवा, ता. ३१ :** व्हॉट्सअॅपवर अनोळखी क्रमांकावरून वेळोवेळी कॉल करून ५० लाख रुपयांची खंडणी मागून न दिल्यास खून करण्याची धमकी देणाऱ्या अज्ञात आरोपीला मुंढवा पोलिसांनी अटक केली आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २६ ते २९ जुलै दरम्यान त्यांना व्हॉट्सअॅपवर अनोळखी क्रमांकावरून वेळोवेळी कॉल करून, तुमने बहुत पैसा कमाया है, मुझे ५० लाख रुपये खंडणी चाहीये, नहीं तो मैं तुम्हारा मर्डर करूंगा असा धमकीचा पवित्रा आरोपीने घेतला होता. या प्रकारामुळे फिर्यादी भयभीत होऊन पोलिसांकडे तक्रार दिली होती.




फिर्याद मिळताच मुंढवा पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू महानोर यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाकडे सोपवण्यात आला. आरोपी फोन बंद करून पसार झाला होता. मात्र पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढत त्याला घोरपडी परिसरात भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळवली.

दरम्यान, त्यानुसार पोलिस अंमलदार अक्षय धुमाळ व स्वप्नील रासकर यांनी सापळा रचून बुधवारी (ता. ३०) रात्री साडेनऊ वाजता आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्यावर खंडणीसह धमकीचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगीरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मुंढवा पोलीस स्टेशन कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती माया देवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. बाबासाहेब निकम यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक राजु महानोर, पोलीस उप-निरीक्षक युवराज पोमण, सहा. पोलीस फौजदार राजु कदम, पोलीस हवालदार विनोद सांळुके, शिवाजी जाधव, राहुल धोत्रे, योगेश गायकवाड, राहुल मोरे, शिवाजी धांडे, पोलीस अंमलदार अक्षय धुमाळ, स्वप्नील रासकर, रुपेश तोडेकर, योगेश राऊत यांचे पथकाने केली.

## यवत येथे शिवरायांच्या पुतळ्याची विटंबना करणारा ताब्यात

**यवत, ता. ३१ :** अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या अमीन पापा सय्यद याला अटक करण्यात आल्याची माहिती बारामती विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली असून शनिवार रोजी रात्रीच्या सुमारास यवत स्टेशन येथील निळकंठेश्वर मंदिरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या अमीन पापा सय्यद हा गुन्हा घडल्यापासून घराच्या पाठीमागे असलेल्या शेतातच लपून बसलेल्या होता.


त्याला बुधवारी (ता. ३०) रात्री पावणे अकराच्या सुमारास आरोपीला अटक करण्यात आले असल्याची माहिती गणेश बिरादार यांनी दिली आहे.

# गोळेवाडी सिंहगड पायथा येथे वानरांच्या टोळीचा धुडगूस

**विशाल भालेराव**

खडकवासला, ता. ३१ : डोणजे येथील गोळेवाडी (ता. हवेली) येथे वानरांच्या टोळीने धुडगूस घातला आहे. वानरांमुळे होत असलेल्या नुकसानीने नागरिक, व्यवसायीक हैराण झाले आहेत. यामुळे वनविभागाने वानरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

सिंहगड पायथा गाळेवाडी या ठिकाणी दहाबारा वानरांची टोळी बऱ्याच दिवसांपासून येत आहे. त्यांनी गावातच वास्तव्य केले आहे. त्यामुळे ती आता निडर झाली आहेत. ही वानरे घरावरील कौलांचे नुकसान करीत आहेत. रस्त्याने जाणारे नागरिक व लहान मुले यांच्या हातातील वस्तू तसेच घराबाहेरील वस्तू पळवीत आहेत. एवढेच नाहीतर काहींच्या घरात व हॉटेल मध्ये शिरून कांदे बटाटेसारख्या खाण्याच्या वस्तूही पळवत आहेत. याशिवाय परड्यातील झाडांची नुकसान करत आहेत. तर सार्वजनिक कार्यक्रमातील पंगतीत घुसून ताटातील पदार्थ पळवण्याच्या घटना घडल्याचे नागरिक सांगत आहेत. यामुळे सिंहगडावर येणारी लहान मुले, महिलांच्या मनात भीती निर्माण झाली असून, वनविभागाने वानरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. यापूर्वी वानरे गावात येत नव्हती. परंतु मागील एक दोन वर्षात वानरे ही मानव वस्तीत येऊ लागली आहेत. रानात वानरांना खाद्य मिळत नसल्याने ते गावात येत आहेत. गावात खाद्य मिळू लागल्याने त्यांनी गावातच ठाण मांडायला सुरुवात केली असल्याचे वयोवृद्ध सांगत आहेत.



> गोळेवाडी येथेही वानरांच्या उपद्रवामुळे स्थानिक दुकानदार, व्यावसायिक, नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून शेतीचेही नुकसान करत असल्याने वनविभागाने या वानरांचा बंदोबस्त करावा
> - **ज्ञानेश्वर कोडीतकर,** (अध्यक्ष शिवालिका संघटना महाराष्ट्र राज्य)







## संक्षिप्त

### लग्नाचे आमिष दाखवून केला बलात्कार; अल्पवयीन तरुणी ८ महिन्यांची गरोदर



**सातारा, ता. ३१ :** सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन मुलाने आपल्याच अल्पवयीन मैत्रिणीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे, कारण या घटनेतून पीडित अल्पवयीन मुलगी ८ महिन्यांची गरोदर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. संबंधित अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खटाव तालुक्यातील एका गावात ही घटना घडली असून अल्पवयीन मुलाने अल्पवयीन मुलीशी मैत्री केली आणि तिला लग्नाचे आमिष दाखवून मुलाने पीडित अल्पवयीन तरुणीशी शेतात नेऊन दोन वेळा शारीरिक संबंध ठेवले. हा प्रकार कोणालाही न सांगण्याची धमकी मुलाने मुलीला दिली होती. मात्र, मुलगी ८ महिन्यांची गरोदर असल्याचे उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांना संपूर्ण प्रकरण कळले. या गंभीर प्रकारानंतर मुलीच्या कुटुंबीयांनी तरुणाविरुद्ध तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. या घटनेची गांभीर्यता लक्षात घेत, संबंधित अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु असून दरम्यान, या घटनेमुळे समाजात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. पालकांनी आणि प्रशासनाने अशा घटना रोखण्यासाठी अधिक जागरूक राहणे गरजेचे आहे, असे मत आता व्यक्त होत आहे.

### डॉक्टरांना क्यूआर कोड अनिवार्य; बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी निर्णय

**पुणे, ता. ३१ :** महाराष्ट्रात आता नोंदणीकृत डॉक्टरांसाठी क्यूआर कोडचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे, ज्यामुळे नागरिकांना डॉक्टरांची खरी ओळख, पात्रता आणि परवान्याची माहिती मोबाईलवर सहज तपासता येणार आहे. विधानसभेत झालेल्या चर्चेनंतर राज्यातील वाढत्या बोगस डॉक्टरांच्या समस्येवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. गेल्या ५ वर्षांत ३९१ बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल होऊनही केवळ २ जणांना शिक्षा झाल्याची आकडेवारी लक्षात घेता, 'नो युअर डॉक्टर' ही प्रणाली तातडीने लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंबंधीचा आदेश पुढील २ आठवड्यांत जारी होईल. प्रत्येक नोंदणीकृत डॉक्टरांनी त्यांच्या रुग्णालयात किंवा क्लिनिकमध्ये हा क्यूआर कोड असलेले कार्ड ठळकपणे प्रदर्शित करणे आता बंधनकारक असणार आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ११ फेब्रुवारी २०२५ रोजी ही प्रणाली सुरू केली असली तरी, २ लाख नोंदणीकृत डॉक्टरांपैकी केवळ १०,००० डॉक्टरांनीच आतापर्यंत यात ऐच्छिक नोंदणी केली आहे.आता नोंदणी करणे सर्व डॉक्टरांसाठी सक्तीचे असणार आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने या निर्णयाचे स्वागत करत, यामुळे बोगस डॉक्टरांना निश्चितपणे आळा बसेल आणि प्रामाणिक डॉक्टरांवरील नागरिकांचा विश्वास वाढेल, असे मत व्यक्त केले.

# नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर भूसंपादनासाठी राज्य सरकारचा निधी

**पिंपरी-चिंचवड, ता. ३१ :** पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. नाशिक फाटा ते खेड या भागातील रस्ता रुंदीकरणाला (एलिव्हेटेड कॉरिडॉर) चालना देण्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुशंगाने राज्य शासनाकडून भूसंपादनासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील नाशिक फाटा ते खेड



या दरम्यान आठ पदरी उन्नत मार्गाचे मोठे काम हाती घेतले आहे. त्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. मात्र, भूसंपादनाअभावी निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यासाठी १०० टक्के भूसंपादन होणे आवश्यक आहे. त्याशिवाय काम सुरू करता येणार नाही, अशी अट घालण्यात आली आहे. पण, पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे भूसंपादनाचे काम रखडले आहे.

> नाशिक फाटा ते खेड या भागातील रुस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादनासाठी निधी मिळावा, असा प्रस्ताव पिंपरी-चिंचवड म हानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्य सरकारला पाठवला आहे. त्याला मान्यता द्यावी, यासाठी भाजपा महायुती सरकारने सकारात्मक भूमिका घेतली. भूसंपादन निधीचाही प्रश्न मार्गी लागणार आहे. आता वाहतूक सक्षम होण्यास मदत होईल आणि पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळेल, असा विश्वास आहे.
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे या महत्त्वपूर्ण मुद्याकडे लक्ष वेधले होते. पुणे, पिंपरी-चिंचवडसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या या पुणे-नाशिक महाम र्गाच्या कामासाठी भूसंपादन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वित्तीय सहाय्य मिळावे. या करिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिक आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या दोन्ही अस्थापनांनी राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे आमदार लांडगे यांनी सातत्त्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळताना दिसत आहे.

**राज्य सरकारकडे काय आहे प्रस्ताव?**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नाशिक फाटा ते खेड दरम्यानचा रस्त्यासाठी १ लाख २३ हजार ८४३ चौरस मीटर भूसंपादनाकरिता २६२ कोटी ७९ लाख १६ हजार ७७१ रुपये इतके वित्तीय सहाय्य मिळावे, असा प्रस्ताव आहे. तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील १४.१ हे. पैकी १०.५०१३ हे क्षेत्राचे भूसंपादन व या प्रकल्पाचा महाराष्ट्र शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या राज्य वस्तू व सेवा कर आणि स्वामित्व शुल्क असे २८८ कोटी रुपये वित्तीय सहाय्य राज्य शासनामार्फत उपलब्ध होण्याबाबत नगर विकास विभागाला प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर नाशिक फाटा ते खेड आठ पदरी उन्नत मार्गाच्या रॅम्पचे आणि ६५ मीटर रिंग रोडसाठी म्हणजे सोळू ते निरगुडी (लोहगाव) मार्गाचे काम सुरू करता येणार आहे.

### डोर्लेवाडीच्या उपसरपंचपदी सुनील म्हेत्रे बिनविरोध

**डोर्लेवाडी, ता. ३१ :** डोर्लेवाडी (ता. बारामती) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुनील मारुती म्हेत्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.




ग्रामपंचायतीचे उपसरपंच विश्वजीत भारत घोडे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी सरपंच सुप्रिया मनोज नाळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता. ३०) ग्रामपंचायत कार्यालयात हि निवड करण्यात आली. उपसरपंचपदासाठी सुनील म्हेत्रे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे सरपंच सुप्रिया नाळे यांनी जाहीर केले तर ग्रामपंचायत अधिकारी सुनील माने यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले. यावेळी सदस्य सचिन निलाखे, प्रशांत जाधव, राहुल भोपळे, सुमित्रा वामन, राणी नेवसे, रेखा नाळे, विद्या काळकुटे, विश्वजीत घोडे हे उपस्थित होते.

## एकवीरा देवी मंदिराचे काम रखडले

**पुणे, ता. ३१ :** महाराष्ट्रातील ५०० वर्षांपेक्षा जास्त जुन्या झालेल्या मंदिरांच्या दुरुस्तीचे मोठे काम खूपच हळू सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील ९ प्रमुख मंदिरांपैकी आतापर्यंत केवळ रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील धूतपापेश्वर मंदिराचेच नूतनीकरण पूर्ण झाले आहे. इतर ८ मंदिरांची कामे अजूनही अपूर्ण असून, ती पूर्ण करण्यासाठी डिसेंबर २०२६ उजाडण्याची शक्यता आहे.

सरकारने हाती घेतलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेला दोन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. राज्यातील या प्राचीन मंदिरांना नवसंजीवनी देण्याचा निर्णय राज्य शासनाने सुमारे तीन वर्षांपूर्वी घेतला होता. या कामाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपवण्यात आली होती. मंदिरांची पडझड झालेली छत, संरक्षक भिंती आणि इतर भागांची दुरुस्ती करताना




त्यांची मूळ स्थापत्यशैली कायम ठेवणे हे मोठे आव्हान ठरले आहे. दरम्यान, अजून फक्त एका मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, या कामासाठी सुमारे १२५ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या. यादीतील सर्व मंदिरे राज्याचा समृद्ध इतिहास दर्शवतात. त्यामुळे त्यांच्या मूळ बांधकामाला धक्का न लावता, अत्यंत बारकाईने दुरुस्तीची कामे करावी लागत आहेत. यात पुणे जिल्ह्यातील कार्ला येथील एकवीरा देवी मंदिर, बीडमधील पुरुषोत्तमपुरी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कोपेश्वर मंदिर या प्रमुख मंदिरांचा समावेश आहे. धूतपापेश्वर मंदिराचे काम पूर्ण झाले असले, तरी उर्वरित कामांना अपेक्षित वेग मिळत नसल्याने भाविकांकडून चिंता व्यक्त होत आहे.

## ज्येष्ठांसाठी 'एल्डरलाइन १४५६७' हेल्पलाइन ठरतेय वरदान

### ४ लाखांहून अधिक वृद्धांना मिळाली मदत

**पुणे, ता. ३१ :** ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेली राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन 'एल्डरलाइन १४५६७' देशभरातील वृद्धांसाठी मोठा आधार बनली आहे. आतापर्यंत या हेल्पलाइनवर ४ लाखांपेक्षा जास्त कॉल्स आले असून, त्यापैकी ३० हजारांहून अधिक प्रकरणांचे यशस्वीरित्या निकाल लावण्यात आले आहेत. यामुळे ज्येष्ठांना मोठी मदत होत आहे.



वर्षात फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट आणि २ ऑक्टोबर या ३ दिवशीच सुट्टी असते. त्या व्यतिरिक्त ही हेल्पलाइन आठवड्याचे ७ दिवस, सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत कार्यरत असते. या सेवेला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, ज्येष्ठ नागरिक www.elderline.dosje.gov.in या संकेतस्थळावरही माहिती मिळवू शकतात.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाने सुरू केलेली ही सुविधा, मुले परदेशात असलेल्या वृद्धांना, हरवलेल्या ज्येष्ठांना किंवा कौटुंबिक अडचणीत सापडलेल्यांना मदतीचा हात देते. जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून ही सेवा मोफत पुरवली जाते. यात वृद्धाश्रम, आरोग्य, पेन्शन, सरकारी योजना, कायदेशीर मार्गदर्शन, भावनिक आधार, कौटुंबिक वाद आणि पोलिसांची मदत अशा विविध सेवांचा समावेश आहे.

दरम्यान, ही हेल्पलाइन उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू आणि कर्नाटक यांसारख्या अनेक राज्यांमध्ये आधीच सुरू आहे. इतर राज्यांमध्येही ती लवकरच सुरु करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## पावसाळ्यात कांदा-लसूण खाणे का टाळतात?; ही आहेत प्रमुख कारणे


पुणे : मान्सूनचा हंगाम सुरू झाला की अनेक घरांमध्ये जेवणातील काही पदार्थ पूर्णपणे टाळले जातात. यातील प्रमुख पदार्थ म्हणजे कांदा आणि लसूण हे आहेत. पावसाळ्यात अनेक लोक कांदा आणि लसूण खाणे टाळतात. यामागे धार्मिक कारणे असली तरी, आयुर्वेदाने आरोग्याच्या दृष्टीने काही कारणे दिली आहेत. पावसाळ्यात हवामानातील बदलांमुळे आपली पचनशक्ती कमकुवत होते.

आयुर्वेदानुसार, कांदा आणि लसूण हे पचायला जड असतात. पावसाळ्यात जड अन्न पचवण्यासाठी पचनसंस्थेला अधिक मेहनत करावी लागते. यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणेसारख्या समस्या उद्भवू शकतात. कांदा आणि लसूण खाल्ल्याने या समस्या आणखी वाढू शकतात, असे मानले जाते.

पावसाळ्यात वातावरणात आर्द्रता वाढते आणि बॅक्टेरिया व बुरशींची वाढ झपाट्याने होते. कांदा आणि लसूण हे जमिनीखाली वाढणारे आहेत. त्यांना योग्य प्रकारे स्वच्छ केले नाही किंवा साठवले नाही, तर त्यावर मातीतील जीवाणू आणि बुरशी वाढण्याचा धोका जास्त असतो.

अशा वेळी कांदा किंवा लसूण खाल्ल्याने अन्न विषबाधा (Food Poisoning) किंवा पोटाचे विकार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे संसर्गाचा धोका कमी करण्यासाठी पावसाळ्यात ते टाळण्याचा सल्ला दिला जातो.

याशिवाय, धार्मिक दृष्ट्या कांदा-लसूण तामसिक गुणधर्म असलेले मानले जातात, ज्यामुळे ते मन आणि शरीरात आळस आणि उत्तेजना वाढवतात असे म्हटले जाते. आरोग्याच्या या कारणांमुळे, आजही अनेक घरात पावसाळ्यात कांदा आणि लसूण मर्यादित प्रमाणात वापरले जातात किंवा पूर्णपणे टाळले जातात.



## तुम्हालाही होतोय का ‘होम सिकनेस’चा त्रास?

पुणे : शिक्षण, नोकरी किंवा इतर कारणांमुळे अनेकदा आपल्याला घरापासून दूर राहावे लागते. अशावेळी काही व्यक्तींना तीव्रतेने घराची आठवण येते, ज्याला सामान्य भाषेत ‘होम सिकनेस’ असे म्हटले जाते. ही भावनिक आणि शारीरिक स्तरावर जाणवणारी एक नैसर्गिक प्रतिक्रिया आहे, असे मानसोपचार तज्ज्ञ सांगतात.

जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या ओळखीच्या वातावरणापासून, कुटुंबापासून आणि मित्रांपासून दूर जाते, तेव्हा तिला असुरक्षित आणि एकटे वाटू शकते. यातूनच मनात घरची तीव्र ओढ निर्माण होते, जी 'होम सिकनेस' म्हणून ओळखली जाते. ही स्थिती कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला येऊ शकते, विशेषतः नवीन ठिकाणी गेल्यानंतर सुरुवातीच्या काळात ती अधिक जाणवते.

होम सिकनेसची लक्षणे प्रत्येकामध्ये वेगवेगळी असू शकतात, पण काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे आहेत : सतत उदास वाटणे, एकटेपणा जाणवणे, चिंता किंवा भीती वाटणे, चिडचिडेपणा येणे, किंवा निराश होणे. झोप न लागणे किंवा जास्त झोप येणे, भूक न लागणे किंवा जास्त भूक लागणे, डोकेदुखी, पोटदुखी, किंवा मळमळ जाणवणे. सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहणे, नवीन लोकांशी बोलणे टाळणे, किंवा दैनंदिन कामात लक्ष न लागणे.

**यावर मात कशी कराल?**

- मानसोपचार तज्ज्ञांनुसार नवीन ठिकाणी रुळण्याचा प्रयत्न करा: नवीन मित्र बनवा, स्थानिक गोष्टींमध्ये भाग घ्या.
- व्यस्त राहा : छंद जोपासा, कामात किंवा अभ्यासात स्वतःला गुंतवून घ्या.
- कुटुंबियांशी संपर्क साधा : फोन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे कुटुंबियांशी बोलत राहा.
- नियमित व्यायाम करा : नियमित व्यायाम करा यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहते.
- मनमोकळेपणाने बोला: तुम्हाला काय वाटते हे जवळच्या व्यक्तींशी किंवा मित्रांशी बोला.

# कोरेगाव मूळ येथे गायरान जमिनीच्या वादातून दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी

## उरुळी कांचन पोलीस ठाण्यात ५ जणांवर गुन्हे दाखल

**उरुळी कांचन, ता. ३१ :** गायरान जमिनीवरील वादातून दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत घडली. रविवारी (ता. २७) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली असून याप्रकरणी दोन्ही गटांच्या फिर्यादीवरून उरुळी कांचन पोलीस ठाण्यात दोन्ही गटातील ५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याप्रकरणी एक तक्रारदर व स्वप्निल पांडुरंग मोरे (वय २७, व्यवसाय - टेंपो चालक रा. कोरेगाव मूळ) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी स्वप्निल पांडुरंग मोरे, विजय मारुती शिंदे, केतन बाळासो सोनवणे (रा. सर्व कोरेगाव मूळ, मोरे वस्ती, ता. हवेली) तसेच समाधान परशुराम अवचट व सारिका प्रकाश पाथरकर (रा. दोघेही कोरेगाव मूळ, मोरे वस्ती ता. हवेली) यांच्याविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या तक्रारीनुसार स्वप्निल मोरे विजय शिंदे, व केतन सोनवणे हे गायरान जागेमध्ये सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास आंघोळीसाठी असलेल्या न्हाणी (बाथरूम) शेजारी खड्डे घेत होते. यावेळी तक्रारदार यांनी खड्डे घेत असताना त्यांना तुम्ही आमचे न्हाणी जवळ कशाला खड्डा खांदता आम्ही आंघोळ कसे करणार असे विचारले. यावेळी स्वप्निल मोरे




म्हणाला की जागा तुमच्या बापाची नाही हे गायरानाची जागा आहे. यावेळी फिर्यादी यांनी स्वप्नीलला तू व्यवस्थित बोल असे सांगितले.

तरीही स्वप्निलने जातीवाचक शिवीगाळ करत ढकलून दिले. यावेळी स्वप्निलच्या हातात असलेली पार पडून फिर्यादी या जखमी झाल्या.

यावेळी फिर्यादी व त्यांच्या भावाला आरोपींनी हाताने लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच स्वप्निल मोरे याने मारहाण करत वीट फेकून डाव्या बाजूला मारली. याशिवाय तिच्या भावाची स्कुटी फोडून नुकसान करण्यात आले. त्यानुसार स्वप्निल मोरे, विजय शिंदे, केतन सोनवणे विरुद्ध तक्रार देण्यात आली आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत केतन सोनवणे यांच्या घराशेजारी गायरान जागेमध्ये सार्वजनिक गणपती बसविण्यासाठी स्वप्नील मोरे व त्यांचे मित्र किशोर अडसूळ, आकाश घटमाळी, अविनाश शिंदे, केतन सोनवणे असे सर्वजण जागा स्वच्छ करीत होते. जागा स्वच्छ करीत असताना सारिका पाथरकर व तिचा भाऊ समाधान अवचट त्या ठिकानी आले व तुझ्या बापाची जागा आहे का तू येथे कोणाला विचारून स्वच्छता करत आहे असे म्हणत फिर्यादी मोरे यांचा शर्ट धरून धक्काबुक्की सुरु केली.

यावेळीफिर्यादीमोरेयांच्याआजी कांताबाई मोरे या मध्ये येऊन सारिका पाथरकर हिला समजावत असताना समाधान अवचट याने तेथे पडलेला दगड हातामध्ये घेऊन तू माझ्या बहिणीला बोलतो का असे म्हणून त्याच्या हातातील दगड फेकून मारल्याने तो दगड कांताबाई मोरे यांच्या डोक्यात लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. याप्रकरणी समाधान अवचट व सारिका पाथरकर या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल खोमणे करीत आहेत.

### गायरान जागेवर बंगल्याची कामे सुरु

कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या गायरान जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून मोठमोठ्या बंगल्याची कामे सुरु आहेत. हे सर्व ग्रामपंचायतीला माहिती असूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत मात्र बघ्यांची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



## पळसनाथ विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**संतोष पवार**

पळसदेव, ता. ३१ : पळसदेव येथील पळसनाथ विद्यालयात इंदापूर तालुका माजी सैनिक नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी वह्या व इतर शालेय उपयोगी साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पळसनाथ विद्यालयातील सुमारे २५ गरजू होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप यावेळी करण्यात आले. इंदापूर तालुका माजी सैनिक नागरी सहकारी पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक कार्यास हातभार लावला. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली, हे निश्चितच आदर्शवत उपक्रम असल्याचे मत पळसदेव (ता. इंदापूर) येथील पळसनाथ विद्यालयाचे प्राचार्य विकास पाठक यांनी व्यक्त केले.

माजी सैनिक नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने इंदापूर तालुक्यातील जवळपास नऊ माध्यमिक विद्यालये आणि करमाळा (जि. सोलापूर) येथील विद्यालयातील जवळपास २०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याची माहिती यावेळी पतसंस्थेचे विद्यमान संस्थापक अध्यक्ष सुखदेव काटे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यास हातभार लावण्यासाठी माजी सैनिक नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने असे विधायक कार्यक्रम दरवर्षी राबवले जातात.

यावेळी इंदापूर तालुका माजी सैनिक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुखदेव काटे, संचालक व पळसदेवचे प्रतिष्ठित नागरिक सेवानिवृत्त पोलिस अधिकारी अर्जुन विपट, पळसदेवचे माजी सैनिक हनुमंत काळे, विद्यालयाचे प्राचार्य विकास पाठक, पर्यवेक्षक संजय जाधव, तानाजी इरकल ,संतोष पवार आदिंसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेअर बाजारात जादा परताव्याच्या आमिषाने तरुणाची फसवणूक

**पुणे, ता. ३१ :** शेअर बाजारात आकर्षक परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी चतुःशृंगी परिसरातील एका तरुणाची तब्बल ४४ लाख ८१ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. फेब्रुवारी महिन्यात या तरुणाच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत एक संदेश आला.

संदेश पाठवणाऱ्या व्यक्तीने तरुणाला ‘चांगला परतावा मिळवून देतो’ असे सांगत आकर्षक योजनांची माहिती दिली. तरुणाने गुंतवणूक केल्यानंतर सुरुवातीला काही प्रमाणात परतावा मिळाल्याने तरुणाचा विश्वास बसला. फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर या प्रकरणी चतुःशृंगी पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणाने वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये सुमारे ४४ लाख ८१ हजार रुपये संबंधित आरोपींच्या बँक खात्यांमध्ये जमा केले. मात्र, त्यानंतर त्याला परतावा मिळाला नाही, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, तरुणाने चतुःशृंगी पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

पोलिस निरीक्षक अश्विनी ननावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सबंधित प्रकरणाचा तपास सुरू आहे. दरम्यान, सायबर चोरट्यांकडून अशा प्रकारे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक सुरू असून, सायबर पोलिसांकडून वेळोवेळी सतर्क राहण्याचे आवाहन केले जात आहे. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दौंडमध्ये जुगार अड्ड्यावर छापा; सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**दौंड, ता. ३१ :** दौंड शहरातील पार्वती नगर परिसरात असलेल्या हॉटेल कृष्णाईच्या मागील बाजूस सुरू असलेल्या तीन पत्ती जुगार अड्ड्यावर दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने छापा टाकून सहा जणांविरोधात मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी पोलीस हवालदार विशाल जावळे यांनी फिर्याद दिली आहे. नागेश ताटे, विनोद लवटे, बाबू कोळी, शांताराम घोलप, सोन्या खंडागळे आणि पवार मामा (सर्व राहणार दौंड) अशी आरोपींची नावे आहेत.

दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार



पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला असता, काही जण पोलिसांची चाहूल लागताच पळून गेले. मात्र, नागेश ताटे, विनोद लवटे, बाबू कोळी आणि शांताराम घोलप यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केल्यावर पळून गेलेल्यांची नावे सोन्या खंडागळे व पवार मामा असल्याचे समोर आले. जुगार अड्ड्यावरून १,८०० रुपये रोकड व जुगाराचे साहित्य (पत्ते) जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई पुणे जिल्हा ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या आदेशानुसार करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अनिल ओमासे, सहाय्यक फौजदार सुभाष डोईफोडे, पोलीस हवालदार विशाल जावळे, आणि पोलीस शिपाई सागर गलांडे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

## कायम नोकरीच्या आमिषाने फसवणूक; महापालिकेचा कंत्राटी कर्मचाऱ्यांना इशारा

**पुणे, ता. ३१ :** पुणे महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दरवर्षी सार्वजनिक रस्त्यांच्या सफाईसाठी ठेकेदारांमार्फत कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. मात्र, अलीकडील काळात महापालिकेकडे काही गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या असून, काही एजंट किंवा व्यक्ती सफाई कर्मचाऱ्यांना तुम्हाला महापालिकेत कायमची नोकरी मिळवून देतो असे सांगून मोठ्या प्रमाणात पैसे उकळत असल्याचे प्रकार समोर आले आहेत.




या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी एक अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, ठेकेदारांमार्फत नेमण्यात आलेले सफाई कर्मचारी हे केवळ कंत्राटी स्वरूपात आणि मर्यादित कालावधीसाठी नियुक्त करण्यात आले आहेत. सध्या महापालिकेत त्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याबाबत कोणताही प्रस्ताव, योजना किंवा प्रक्रिया अस्तित्वात नाही.

महापालिकेने स्पष्ट सूचना दिली आहे की, सफाई कर्मचाऱ्यांनी अशा खोट्या आश्वासनांना बळी पडू नये आणि कोणतीही आर्थिक देवाणघेवाण टाळावी. आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचा बचाव करणे आवश्यक आहे. तसेच, या प्रकाराबाबत कोणतीही शंका असल्यास तत्काळ संबंधित विभागाशी संपर्क साधावा.

महापालिकेने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना दिली आहे की, ही माहिती नोटीस बोर्डावर, कार्यालयीन परिसरात तसेच स्थानिक प्रसार माध्यमांतून प्रसारित करावी, जेणेकरून अधिकाधिक कर्मचाऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचेल आणि फसवणूक टाळता येईल. महापालिकेने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, कायम नोकरी मिळवून देतो असे सांगणारे दावे पूर्णपणे खोटे असून, अशा प्रकारची माहिती लपवून ठेवल्यास किंवा सहभागी झाल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## वानवडीत डेकोरेशन व्यावसायिकाच्या कारमधून २१ लाखांची बॅग लंपास

**पुणे, ता. ३१ :** वानवडी परिसरातील एका डेकोरेशन व्यवसायिकाला आपल्या नव्याने ठेवलेल्या चालकाचा विश्वासघात बसला आहे. चालकाने कारमध्ये ठेवलेली तब्बल २१ लाख रुपयांची रोकड चोरी करून फरार झाला होता. अखेर, मुंब्रा परिसरातून पोलिसांनी त्याला अटक केली असून १५ लाखांची रोख रक्कम व इतर माल हस्तगत करण्यात यश आले आहे.

ही घटना २९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी चारच्या सुमारास कोरिथन क्लब, पुणे येथील पार्किंगमध्ये घडली. याबाबत गिरीष अनिलचंद्र अग्रवाल (वय-४७, रा. क्लोव्हर व्हिलेज, वानवडी) यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांचा डेकोरेशनचा व्यवसाय असून त्यांनी सलमान पठाण या तरुणास आठ दिवसांपूर्वी चालक म्हणून कामावर ठेवले होते.

कामगारांना पगार देण्यासाठी अग्रवाल यांनी कारमध्ये ठेवलेली २१ लाखांची बॅग सलमान पठाणने लुबाडली. कोरिथन क्लबच्या पार्किंगमध्ये एका ओळखीच्या व्यक्तीशी बोलत असताना, गाडी शेडखाली लावतो असे सांगून पठाण कारसह तेथून निघून गेला आणि काही अंतरावर गाडी उभी करून पैशांची बॅग घेऊन पसार झाला. त्यानंतर त्याने स्वतःचा मोबाईलही बंद केला होता.

तांत्रिक विश्लेषणाद्वारे पोलीस हवालदार प्रतिक लाहिगुडे यांनी आरोपीचा लोकेशन शोधून काढला. त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक अमित शेटे, तसेच पोलिस अंमलदार दाऊद सय्यद, शाहिद शेख, प्रदीप बेडीस्कर यांनी मुंब्र्यातील शिळडायघर पोलीस ठाण्याच्या परिसरात सापळा रचून सलमान पठाणला मित्राच्या मदतीने ताब्यात घेतले. चोरी केलेल्या मालापैकी १५ लाख रुपये रोख रक्कम, सोन्याचे दागिने, कार व मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केला आहे.

# खडकवासला ते पानशेत रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचे ढीग

## रात्र होताच हॉटेल, फार्महाऊस, रिसॉर्ट चालकांचा कचरा येतोय रस्त्यावर

**विशाल भालेराव**

खडकवासला, ता. ३१ : खडकवासला गावापासून थेट पानशेत पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसत असून परिसरातील हॉटेल, फार्महाऊस, रिसॉर्ट यांमधून हा कचरा पोत्यांमध्ये भरुन रात्रीच्या वेळी आणून टाकला जात आहे. प्रशासनाकडून कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस पुणे-पानशेत रस्ता या कचऱ्यामुळे अधिकाधिक बकाल होत चालला आहे. धक्कादायक म्हणजे पाऊस आल्यानंतर हा कचरा थेट खडकवासला धरणाच्या पाण्यात मिसळून पाणी दुषित होत आहे.



पुणे-पानशेत रस्त्यावरील खडकवासला, गोऱ्हे बुद्रुक, डोणजे, घेरासिंहगड, गोऱ्हे खुर्द, खानापूर, मालखेड, वरदाडे, निगडे, ओसाडे, सोनापूर, रुळे, आंबी, कुरण व पानशेतसह आजूबाजूच्या इतर गावांच्या हद्दीत अनेक हॉटेल, फार्महाऊस, रिसॉर्ट आहेत. लाखो पर्यटक या भागात येत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. या भागातील ग्रामपंचायतींनी कचरा व्यवस्थापन केलेले नसल्याने बहुतांश व्यावसायिक हे दररोज रात्री कचऱ्याची पोती भरुन जागा मिळेल तेथे आणून टाकत आहेत.

परिणामी सर्व गावांच्या हद्दीत रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचे ढीग पडलेले दिसत आहेत. प्रशासनाकडून कचरा फेकणाऱ्या या व्यावसायिकांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने दिवसेंदिवस निसर्गसंपन्न असलेला पुणे-पानशेत रस्ता बकाल होत चालला आहे. खडकवासला धरणाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या एनडीए-बहुली रस्त्याच्या कडेनेही हेच चित्र दिसून येत आहे.

**कचरा जातोय थेट खडकवासला धरणात**

पुणे-पानशेत रस्त्याला लागून खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्र आहे. धरणाच्या बाजूला उतार असल्याने पाऊस आल्यानंतर सर्व सडलेला कचरा, घाण थेट खडकवासला धरणाच्या पाण्यात मिसळून पाणी दुषित होत आहे. खडकवासला धरणाच्या पाण्यात कचरा, सांडपाणी मिसळून होत असलेल्या प्रदुषणाबाबत जनसेवकांनी सातत्याने शासन, प्रशासनाचे लक्ष वेधलेले आहे मात्र अद्याप प्रत्यक्षात कोणत्याही ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत.

कचऱ्याच्या ढिगांवर मोकाट कुत्र्यांच्या झुंडी कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात खरकटे मांसाहारी पदार्थ असल्याने जागोजागी या कचऱ्याच्या ढिगांवर मोकाट कुत्र्यांच्या झुंडी दिसून येतात. रात्रीच्या वेळी ही कुत्री रस्त्यावर येत असल्याने दुचाकीस्वारांना असुरक्षित वाटत असून अपघातही होत आहेत.

दरम्यान, काही महिन्यापुर्वी खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील सर्व गावांच्या सरपंचांची बैठक घेऊन सूचना देण्यात आलेल्या आहेत. विभागीय आयुक्तांच्या सूचनेनुसार पीएमआरडीए च्या माध्यमातून सांडपाणी व कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.

> संबंधित ग्रामसेवकांच्या माध्यमातून सर्व हॉटेल, फार्महाऊस, रिसॉर्ट व इतर आस्थापनांना लेखी नोटीस देऊन आपापल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. संबंधितांनी आदेशाचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
> - **गजानन पाटील,** मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे जिल्हा परिषद.

> दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे. कचऱ्यामुळे येणारा-जाणारांना तर त्रास होतच आहे.परंतु ज्या खडकवासला धरणाचे पाणी आपण सर्वजण पित आहोत ते मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहे.प्रशासनाने परिस्थिती हाताबाहेर जाण्याच्या अगोदर उपाययोजना करणे आवश्यक आहे.
> - **नवनाथ पारगे,** माजी जिल्हा परिषद सदस्य, डोणजे